डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे
(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
२८, क्वीन्स गार्डन, कॅम्प पुणे- ४११ ००१.
E- mail: directorbarti@gmail.com Web: https://barti.maharashtra.gov.in

जा.क्र.बार्टी/रा.स्मा. महाड/का.स.२४/विपश्यना/२०१७-१८/ ४०६५ दिनांक :- २५/९/२०१७

# परिपत्रक

प्रति,
प्रकल्प संचालक, (सर्व शाखा प्रमुख)
बार्टी, पुणे.

**विषय :- "बार्टी" अंतर्गत सर्व शाखेतील शासकीय, निमशासकीय व इतर अधिकारी, कर्मचारी यांना दहा दिवसीय विपश्यना शिबिरांतर्गत प्रशिक्षण देणेबाबत...**

**संदर्भ :- १) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.:आरजा २४९३/३/सेवा ९ मंत्रालय, मुंबई दि. २१ जुलै,१९९८**

**२) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.:आरजा ४२०२/२७/सेवा ८ मंत्रालय, मुंबई दि. २७ जुन, २००३**

महोदय,

उपरोक्त विषयान्वये डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, (बार्टी), पुणे अंतर्गत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक, महाड येथे शासकीय अधिकारी व कर्मचारी तसेच शाळा-कॉलेज मधील शिक्षक, प्राध्यापक व इतर शासकीय व निमशासकीय उपक्रमांतर्गत येणा-या सर्व व्यक्ती यांच्यासाठी १० दिवसीय विपश्यना (Vipassana) प्रशिक्षण शिबिरे आवश्यक सोई सुविधा व यंत्रणेसह आयोजित करण्यात येत आहेत.

विपश्यना प्रशिक्षण हे १० दिवसीय निवासी शिबिरामध्ये दिले जाते. प्रशिक्षण, निवास आणि भोजन व्यवस्थेसाठी कोणतेही शुल्क आकारले जात नाही. विपश्यना शिबिरासंबंधी अधिक माहिती आणि नियमावली साठी http://www.vridhamma.org/VRI-Introduction या संकेत स्थळांना भेट द्यावी.

विपश्यना साधनेत सहभागी होणा-या प्रशिक्षणार्थीना याचा लक्षणीय लाभ होत आहे. त्यांच्या एकाग्रतेमध्ये वाढ होत आहे. त्याद्वारे त्यांच्या कार्यक्षमतेत वाढ होऊन शासकीय कामकाजात मदत होत आहे. सदर प्रशिक्षणाविषयी माहिती आपल्या अधिकारांतर्गत येणा-या सर्व विभाग प्रमुखांना देण्यात यावी. व आपल्या विभागातील विपश्यना प्रशिक्षण घेण्यास एकावेळेस कमीत कमी एक अधिकारी व कर्मचारी यांची खालीलप्रमाणे यादी तयार करुन **vipassana.01mahad@gmail.com** या मेल आयडी वर पाठविण्यात यावी. जेणेकरुन त्यांच्यासाठी शिबिरात जागा राखून ठेवण्याचे नियोजन [illegible] करता येईल. सदर प्रशिक्षण हे व्यक्तीगत तथा सामाजिक विकासाकरता आवश्यक असून आपल्या शाखेतील प्रत्येक अधिकारी/कर्मचारी यांचा सहभाग आवश्यक आहे.

| क्र. | नाव व पद | फोन नं व ई-मेल | वय/लिंग | विभाग/कार्यालय/उपक्रम | कोणत्या शिबिरात सहभागी व्हावयाचे आहे. |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

(

## दहा दिवसीय विपश्यना शिबिर वेळापत्रक

| अ.क्र. | पुरुषांसाठी | महिलांसाठी |
|---|---|---|
| १. | १ ते १२ ऑक्टोबर २०१७ | - |
| २. | | १५ ते २६ ऑक्टोबर, २०१७ |
| ३. | ५ ते १६ नोव्हेंबर,२०१७ | - |
| ४. | - | १९ ते ३० नोव्हेंबर,२०१७ |
| ५. | ३ ते १४ डिसेंबर,२०१७ | - |
| ६. | - | १७ ते २८ डिसेंबर,२०१७ |
| ७. | ७ ते १८ जानेवारी, २०१८ | - |
| ८. | - | २१ ते १ फेब्रुवारी, २०१८ |
| ९. | ४ ते १५ फेब्रुवारी, २०१८ | - |
| १० | - | १८ ते १ मार्च, २०१८ |
| ११. | ४ ते १५ मार्च, २०१८ | - |
| १२. | | १८ ते २९ मार्च, २०१८ |

**संपर्क फोन नं.- ९४०४९९९४८१/७७१९९२४१८१ ई-मेल :- vipassana.01mahad@gmail.com**

सदर विपश्यना प्रशिक्षण वर्गामध्ये आपण स्वत: व आपल्या शाखेतील जास्तीत जास्त प्रशिक्षणार्थींचा सहभाग वाढविण्यासाठी आपल्या स्तरावर प्रयत्न व्हावे.

**महासंचालक**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन**
**व प्रशिक्षण संस्था, पुणे.**